
A clr Book

# न हसलेली राजकन्या

# The Princess Who Never Smiled



Centre For Learning Resources

8425

## वाचक मित्रांनो

हे पुस्तक दोन्ही भाषांत स्वत:च वाचा आणि आनंद मिळवा. इंग्रजी गोष्ट वाचून समजून घेतांना. आवश्यक वाटल्यास मराठीतील गोष्टीची मदत घ्या.

## पालक व शिक्षक

या गोष्टीमधील शब्द व वाक्यरचना छोट्या वाचकांच्या वाचन क्षमतेनुसार आहेत. म्हणूनच गोष्टीची भाषा सोपी वापरली आहे. शब्दश: भाषांतर केलेले नाही. कारण प्रत्येक भाषेची कथा कथनाची पध्दत जपली आहे.

दोन्ही भाषांतील पूर्व प्राथमिक वयोगटातील मुलांना, पुस्तकातील गोष्ट मोठ्याने वाचून दाखवा आणि चित्रांबद्दल बोला. मोठ्या मुलांना इंग्रजीतील गोष्ट वाचून समजून घेण्यासाठी परिचित मराठीतील गोष्टींच्या सहाय्याने मदत करा.

## To our young readers

Enjoy reading this book on your own in both languages ! You could refer to the story in English to help you to read and understand it in Marathi.

## To parents and teachers

The words and sentence-structures in this story are graded appropriately for young readers. The text of the story is therefore simplified. At the same time, a word-for-word translation from one language to the other has been avoided, so as to preserve the unique rhythm of the story in each language.

Read the story aloud in both languages to preschool children. Talk about the pictures. Help older children to use the familiar English text where necessary in order to make sense of the Marathi.

# न हसलेली राजकन्या
# The Princess Who Never Smiled





रूपांतर आणि चित्रांकन : जयंती मनोकरण
Adapted and Illustrated by Jeyanthi Manokaran

मराठी अनुवाद : अंजली पिंपळखरे
Marathi Translation : Anjali Pimpalkhare


Centre For Learning Resources


राजकन्या जयंती अतिशय सुंदर आणि खूप श्रीमंत होती.
ती मोठ्या राजवाड्यात राहात होती.
राजवाड्यात फारच शांतता होती. अजिबात आवाज नाही ! आणि
राजकन्या जयंती कधी हसलीच नव्हती.

Princess Jayanti was very beautiful and very rich.
She lived in a big palace.
The palace was very quiet. No sounds at all !
And Princess Jayanti never smiled.




तिचे वडील म्हणजे राजेसाहेब, नेहमी काळजीत असायचे.
‘‘हिला मी आनंदी कशी करू शकेन?’’ हाच विचार करायचे.

Her father, the king, was worried.
“How can I make her happy?” he thought.





एके दिवशी राजानं आपल्या राज्यातील सर्व तरुणांना बोलावलं
आणि विचारलं, ''माझ्या मुलीला कोण हसवेल?
जर तू हसवलंस तर तुला माझी अर्धी संपत्ती मिळेल
आणि राजकन्या जयंती तुझी बायको होईल.''

One day, the king called all the young men
in his kingdom, and asked, "Who will make my daughter smile?
If you do, you will get half my riches.
And Princess Jayanti will be your wife."









बऱ्याच श्रीमंतांना राजकन्येशी लग्न करायचं होतं.
ते खूप दूर दूरच्या ठिकाणांहून आले.
ते गायले आणि नाचले. वेगवेगळ्या युक्त्या केल्या.
पण राजकन्या जयंती हसलीच नाही.

Many rich men wanted to marry the princess.
They came from places far away.
They sang and danced. They did tricks.
But Princess Jayanti never smiled.

काही लोकांनी तिला गंमतीदार गोष्टी सांगितल्या.
पण राजकन्या जयंती हसलीच नाही.

Some men told her funny stories.
But Princess Jayanti never smiled.









खूप दूरच्या गावी एक शेतकऱ्याचा मुलगा राहात होता.
त्याचं नाव होतं राजू. राजू खूप कामसू होता.
तो दयाळू आणि प्रामाणिक होता.
पण तो फारच गरीब होता.
राजकन्येशी लग्न करण्याची त्याला काहीच आशा नव्हती.

Far far away there lived a farmer's son.
His name was Raju. Raju worked hard.
He was kind and honest.
But he was very poor.
He could not hope to marry a princess.









एके दिवशी सकाळी एक आश्चर्याची गोष्ट घडली.
कृष्णच त्याच्या पुढे उभा होता. त्यानं हातात
सोन्याचं बदक पकडलं होतं. तो राजूकडे बघून हसला.
तो म्हणाला, ‘‘तू दयाळू आणि प्रामाणिक आहेस, म्हणून मी तुला
सोन्याचे बदक देतोय.’’ मग कृष्ण अदृश्य झाला.

One morning, a strange thing happened.
Lord Krishna stood in front of him. In his hand
he held a golden duck. He smiled at Raju.
"You are kind and honest", he said. "So I give you this
golden duck." Then Lord Krishna disappeared.




राजूनं सोन्याचं बदक काखोटीत मारलं.
तो पळत निघाला. त्याला त्याच्या मित्रांना ते दाखवायचं होतं.
तेवढ्यात एका सैनिकानं ते सोन्याचं बदक पाहिलं.
जसं त्यानं ते हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला, तसं तो राजूला चिकटला.
तो हात सोडवूच शकत नव्हता.

Raju put the golden duck under his arm.
He started to run. He wanted to show it to his friends.
Soon a soldier saw the golden duck.
As he tried to grab it, he got stuck to Raju.
He could not pull his hand away.













त्यांना पळतांना एका विणकरानं पाहिलं.
‘‘सोन्याचं बदक’’ लोभाने तो म्हणाला.
त्यानं पण बदक हिसकावण्याचा प्रयत्न केला.
पण तो चिकटला सैनिकाला.
तो हात सोडवूच शकत नव्हता.
त्यामुळे सैनिक आणि विणकराला राजूबरोबर धावावंच लागलं.

A weaver saw them running.
"A golden duck", he said, greedily.
He too tried to grab it.
But he got stuck to the soldier.
He could not pull his hand away.
So the soldier and the weaver had to run along with Raju.







तेवढ्यात दोन तरूण मुली आल्या.
त्यांनी सुध्दा बदक पळवायचा प्रयत्न केला.
त्याही चिकटल्या.


Then two young girls came along.
They too tried to grab the golden duck.
They too got stuck.





लोभी माणसांची साखळी वाढतच होती वाढतच होती.
लवकरच ते राजवाड्याजवळून पळू लागले.
राजकन्या जयंती खिडकीतून बघत होती.
अचानक तिनं त्यांना पाहिलं. तिला वाटलं ''किती गंमतीदार दिसताहेत हे !''
आणि ती हसू लागली.

The line of greedy people grew and grew and grew.
Soon they were running past the palace.
Princess Jayanti was looking out of the window.
Suddenly she saw them. "How funny they look!" she thought.
And she began to smile.








जेव्हा तिनं ही सगळी कहाणी ऐकली तेव्हां तर ती हसतच राहिली !
तिच्याबरोबर पक्षी नि फुलपाखरंही हसू लागली.

When she heard the whole story, she laughed and laughed!
The birds and butterflies laughed with her.




राजूनं कृष्णाला विनंती केली की या सगळ्या
चिकटलेल्या माणसांना मोकळं करा. आणि राजा म्हणाला,
‘‘हा तरूण माझ्या मुलीशी लग्न करेल
आणि याला माझी अर्धी संपत्ती मिळेल. कारण त्यानंच तिला हसवलंय.’’

राजपुत्र राजू आणि राजकन्या जयंती सुखानं राहू लागले.

Raju asked Lord Krishna to free all the people who were stuck. And the king said, “This young man shall marry my daughter and have half my riches. For he has made her smile!”

Prince Raju and Princess Jayanti lived happily ever after.







## न हसलेली राजकन्या

ह्या गोष्टीच्या पुस्तकाची मजा इंग्रजी व मराठी दोन्ही वाचक लुटू शकतात. परिचित भाषेचा उपयोग करून नवी भाषा चांगल्या प्रकारे शिकता येते हे जागतिक संशोधनातून सिध्द झाले आहे. म्हणून सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस लहान मुलांसाठी द्विभाषिक वाचनसाहित्य विकसित करत आहे.

**सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस (सीएलआर)** ही सेवाभावी शैक्षणिक संस्था आहे. शैक्षणिक कार्यक्रमांसाठी प्रशिक्षण, संशोधन, साधननिर्मिती आणि तज्ञसल्ला यात कार्यरत आहे. भारतातील सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित गटातील मुलांना मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा सुधारणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**जयंती मनोकरण** यांनी ह्या गोष्टीचे रूपांतर व चित्रांकन केले आहे. त्या बालसाहित्यासाठी प्रसिध्द असलेल्या पुरस्कारप्राप्त चित्रकार आहेत. मुलांसाठी पुस्तकांचे लेखन, चित्रकारिता आणि मल्टीमीडिया याबाबत त्यांना विस्तृत आणि समृध्द अनुभव आहे.

मराठी अनुवाद : **अंजली पिंपळखरे**

मुखपृष्ठ आणि सजावट : **रश्मि रानडे**

निर्मिती सहाय्य : **सर रतन टाटा ट्रस्ट**

## The Princess Who Never Smiled

This bilingual storybook can be enjoyed in both English and Marathi. The Centre For Learning Resources is developing a range of graded, bilingual reading materials for young children, based on the globally-researched understanding that a known language can fruitfully be used to learn a new one.

**The Centre For Learning Resources (CLR)** is a non-governmental educational institution involved in training, research, materials development, advocacy and consultancy for educational programmes. Its main goal is to improve the quality of education and development of socially and economically disadvantaged children in India.

**Jeyanthi Manokaran** has adapted and illustrated this story. She is a well-known, award-winning Indian illustrator of children's books. She has had extensive experience in writing and illustrating children's educational resources for print and multimedia.

Marathi Translation : **Anjali Pimpalkhare**

Cover and Book Design : **Rashmi Ranade**

Production Support : **Sir Ratan Tata Trust**